**दिन विशेष...**
१८८४ : स्विस पदार्थविज्ञान शास्त्रज्ञ पिखार ऑगस्टी यांचा जन्म झाला.
१९२५ : डॉ.राजा रामण्णांचा जन्म झाला.
१९५६ : जगाला प्रदक्षिणा घालणारा पहिला इंग्लिश दयावर्दी ड्रेक सर फ्रान्सिस यांचे निधन झाले.
१९९७ : ग्रामोद्धारचे संस्थापक रामचंद्र बाबूरावजी जाधव यांचे निधन.

महाराष्ट्राचे निडर दैनिक
# शौर्य मराठी
RNI-MAHMAR/2023/89125

सेन्सेक्स ८१,५३७.७० -७६९.६६ (०.९४%)
डॉलर ₹ ९१.९१

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३० | १६ |
| दिल्ली | १८ | ०७ |
| मुंबई | ३१ | १८ |
| नागपूर | २९ | १६ |
| पुणे | ३० | ११ |

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | बुधवार, दि. २८ जानेवारी २०२६ | वर्ष २ रे | अंक ७९ किंमत : ५ रु. | पाने ४

**सुविचार**
चांगले विद्यार्थी नेहमी शिकण्याची इच्छा बाळगतात.

सुर्योदय - सुर्यास्त
स.-७:०७ संध्या-६:१४

**सोने - चांदी**
सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,५९,८९५/- ३,३५,०००/-

**केळी भाव**
नवती : १३५५ ते १३६०
पिल बाग : ११०१ ते ११०२
कांदे बाग : ----

# भारत-युरोपियन युनियनमध्ये मुक्त व्यापार कराराची मोठी घोषणा

## हा करार म्हणजे 'सर्व करारांची जननी' असल्याचं पंतप्रधान मोदींचे भाष्य

वृत्तसंस्था । नवी दिल्ली

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के टॅरिफ लादल्याचा फटका भारताला बसत आहे. यातच डोनाल्ड ट्रम्प मागील काही दिवसांपासून सातत्याने भारताच्या विरोधात वक्तव्य करत असल्यामुळे अमेरिका आणि भारताचे व्यापारी संबंध ताणले गेले आहेत. असं असतानाच आता भारत आणि युरोपियन युनियनमध्ये मुक्त व्यापार कराराची अधिकृत घोषणा आज (२७ जानेवारी) करण्यात आली आहे.**



भारत आणि युरोपियन युनियन यांच्यातील 'मदर ऑफ ऑल डील'वर स्वाक्षरी करण्यात आली आहे. त्यामुळे भारतासाठी हा ऐतिहासिक निर्णय मानला जात आहे. भारत व युरोपियन संघातील या मुक्त व्यापार कराराची घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली आहे. भारत आणि युरोपियन युनियनमधील करार म्हणजे 'सर्व करारांची जननी' असल्याचं भाष्य पंतप्रधान मोदींनी केलं आहे.

'हा व्यापार करार जागतिक पुरवठा साखळींना आणखी बळकटी देईल. भारतातील विविध क्षेत्र, जसं की कापड व्यवसाय, रत्न, दागिने यासह आदींना उद्योगांना या व्यापार कराराचा फायदा होणार आहे. जगातील लोक 'सर्व करारांची जननी' म्हणून या कराराची चर्चा करतील. या करारामुळे सर्व भारतीय आणि युरोपीयन देशांमधील लाखो लोकांसाठी मोठ्या संधी उपलब्ध होतील. जगातील दोन प्रमुख अर्थव्यवस्थांमधील समन्वयाचं हे एक अद्भुत उदाहरण ठरलं आहे. हा करार जागतिक जीडीपीच्या अंदाजे २५ टक्के आणि जागतिक व्यापाराच्या सुमारे एक तृतीयांश भागाचं प्रतिनिधित्व करतो', असं मोदींनी म्हटलं आहे.

'या व्यापार करारामुळे भारतातील उत्पादनाला फक्त चालना मिळणार नाही, तर सेवांशी संबंधित सर्व क्षेत्रांचा विस्तारही होण्यास मदत होईल. या मुक्त व्यापार करारामुळे जगातील प्रत्येक व्यवसाय आणि गुंतवणूकदारांचा भारतावरील विश्वास आणखी दृढ होईल. भारत आणि युरोपियन युनियन व्यापार करार लोकशाही आणि कायद्याच्या राज्यासाठीची सामायिक वचनबद्धता देखील मजबूत करतो', असंही पंतप्रधान मोदी यांनी म्हटलं आहे.

### ➢ भारत-युरोपमधील व्यापार करारावरून अमेरिकेचा जळफळाट; स्कॉट बेसेंट यांनी दिला इशारा

स्कॉट बेसेंट यांनी युरोपियन युनियनवर थेट रशिया-युक्रेन युद्धाला निधी पुरवल्याचा आरोप करत युरोपियन युनियन स्वतः विरुद्धच्या युद्धाला फायनान्स करत असल्याचा आरोप केला. स्कॉट बेसेंट यांनी म्हटलं की, 'गेल्या आठवड्यात काय घडलं? याचा विचार करा, आम्ही भारतावर कर लादला आणि युरोप त्यांच्यासोबत व्यापार करार करत आहे. रशिया त्यांचं कच्च तेल भारतात पाठवतो. भारतात तेल शुद्ध केलं जातं आणि नंतर युरोपला विकलं जातं. तांत्रिकदृष्ट्या युरोप हे शुद्ध उत्पादन खरेदी करत आहे, जे प्रत्यक्षात रशियन तेल आहे. ते (युरोपियन देश) स्वतःविरुद्ध युद्धासाठी निधी पुरवत आहेत', असं स्कॉट बेसेंट यांनी म्हटलं आहे.

### ➢ पंतप्रधान मोदी काय म्हणाले?

'भारत-युरोपियन युनियन व्यापार करारामुळे भारतातील उत्पादन वाढेल आणि देशातील सेवा आणि संबंधित क्षेत्रांचा मोठ्या प्रमाणात विस्तार होण्यास मदत होईल. सर्व करारांची जननी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या मुक्त व्यापार करारामुळे जागतिक व्यवसाय आणि गुंतवणूकदारांचा भारतावरील विश्वास आणखी दृढ होईल', असं मोदींनी म्हटलं आहे.

**थोडक्यात**



### मालाडमध्ये सिलिंडरचा स्फोट; सातजण होरपळले

**मुंबई ।** मालाड येथील मालवणी परिसरातील भारत माता शाळेलगतच्या एका चाळीत स्वयंपाकाच्या सिलिंडरचा स्फोट होऊन भीषण आग लागली. या दुर्घटनेत सातजण होरपळले असून उपचारासाठी त्यांना रुग्णालयात नेण्यात आले आहे. मंगळवारी सकाळी ९.३० वाजेच्या सुमारास आग लागताच चाळीत आरडाओरडा सुरू झाला. चाळीतील एका घरात स्वयंपाकाच्या सिलिंडरच्या मुख्य व्हॉल्वला गळती लागली होती.

## जळगावचे महापौर-उपमहापौर ६ फेब्रुवारीला ठरणार

प्रतिनिधी । जळगाव

महानगरपालिकेच्या महापौर आणि उपमहापौर पदाच्या निवडणुकीचा कार्यक्रम अखेर निश्चित झाला असून, येत्या ६ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता महापालिका सभागृहात विशेष बैठक आयोजित करण्यात




आली आहे. विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम (पान २ वर)

# जिल्ह्यात गारपिटीसह वादळी पाऊस

## चोपड्यात गारांसह पाऊस,धरणगावात पिके आडवी; हाता-तोंडाशी आलेला घास हिरावला

प्रतिनिधी । जळगाव

**जळगाव जिल्ह्यात मंगळवारी सायंकाळी अचानक आलेल्या अवकाळी वादळी पावसामुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. जोरदार वाऱ्यासह आलेल्या पावसामुळे अनेक ठिकाणी पिके आडवी झाली असून विशेषतः मका पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. वादळाने वीज वाहिन्या तुटल्याने अनेक भागात अंधार पसरला आहे.**

धरणगाव तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून ढगाळ वातावरण होतेच, आणि मंगळवारी सायंकाळी अचानक निसर्गाने रौद्र रूप धारण केले. वादळी वाऱ्यासह कोसळलेल्या अवकाळी पावसाने क्षणात सगळे चित्र बदलून टाकले. कापणीच्या तोंडावर आलेली रब्बी पिके अक्षरशः जमिनीवर लोळण घेत होती, आणि शेतकऱ्यांच्या डोळ्यांसमोर त्यांच्या आयुष्याची कमाई वाहून जाताना पाहिले.

या अनपेक्षित संकटामुळे तालुक्यातील अनेक गावांमध्ये गहू, मका, हरभरा, केळी, पपई यांसारखी प्रमुख पिके मोठ्या प्रमाणावर उद्ध्वस्त झाली आहेत. वादळी वाऱ्याने उभी पिके आडवी झाली, तर काही ठिकाणी फळबागाही मोडीत निघाल्या. वर्षभर राबून, घाम गाळून उगवलेली शेती काही मिनिटांत मातीमोल झाली. आधीच कर्जबाजारीपणा, वाढता खर्च आणि बाजारातील अनिश्चिततेने त्रस्त असलेला बळीराजा या (पान २ वर)







**शासनाने तातडीने नुकसानग्रस्त भागाचा पंचनामा करून शेतकऱ्यांना योग्य ती आर्थिक मदत जाहीर करावी, अशी कळकळीची मागणी शेतकरी शिवाजी बाबुराव देशमुख यांच्यासह तालुक्यातील पीडित शेतकऱ्यांनी केली आहे.**

### चोपडा तालुक्यात गारांसह पाऊस

**गणपूर, ता.चोपडा -** येथे सायंकाळी ४ वाजेच्या सुमारास काही ठिकाणी वादळी वाऱ्यासह पाण्याचे शिंतोडे तर काही ठिकाणी मध्यम पाऊस आणि गारा पडून शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. गणपूर व परिसरात फक्त पाण्याचे शिंतोडे आणि वादळी वारा आला. मात्र लगतच्या शिरपूर तालुक्यातील बभळाज, अजनाड, सावेर,महादेव दोंडवाडे,चुंचाळे,मामलदे आदी भागात मध्यम पावसासह बोरे व लिंबू एवढ्या गारांसह पाऊस पडला.त्यामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. दरम्यान चोपडा तालुक्यातही शहराच्या उत्तरेकडील भागात वराड, मामलदे,चुंचाळे आदी शिवारासह पूर्वेकडील भागातही नुकसान झाल्याच्या घटना घडल्या असून पुन्हा एकदा शेतकऱ्यांना अवकाळी चा सामना करावा लागला आहे. तसेच बभळाज, सावेर, ता शिरपूर या भागातही गारासह व वादळी वाऱ्यामुळे विद्युत ट्रांसफार्मर वाकून विद्यूत वाहीनी बंद पडला आहे. याभागात शेतीचे नुकसान झाले आहे.

# साकरीत दोन अल्पवयीन मुलींची विहिरीत ढकलून हत्या!

प्रतिनिधी । भुसावळ

**तालुक्यातील साकरी येथे नववीच्या वर्गात शिक्षण घेणाऱ्या दोन अल्पवयीन मुलींचा एका माथेफिरू तरुणाने विहिरीत ढकलल्यामुळे दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना मंगळवारी सकाळी ८ वाजेच्या सुमारास उघडकीस आली. ग्रामस्थांच्या मदतीने पोलिसांनी संशयिताला तातडीने ताब्यात घेतले. त्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, दोन्ही मुली नेहमीप्रमाणे मंगळवारी सकाळी सुमारे ८ वाजेच्या सुमारास शिकवणीसाठी घरातून निघाल्या होत्या. गावालगतच्या शेतरस्त्याने जात असताना दबा धरून बसलेला संशयित रोहन चौधरी याने अचानक त्यांच्यावर हल्ला केला. काही कळण्याच्या आत त्याने दोन्ही मुलींना शेतातील खोल विहिरीत ढकलले आणि घटनास्थळावरून लागलीच पळ काढला. दोन्ही मुलींच्या किंकाळ्या ऐकून जवळच शेतात काम करणारे शेतकरी आणि रस्त्याने जाणारे ग्रामस्थ तातडीने विहिरीकडे धावले. घटनेची माहिती वाऱ्यासारखी गावात पसरताच शेकडो ग्रामस्थ घटनास्थळी जमा झाले. ग्रामस्थांनी तात्काळ बचावकार्य सुरू केले. मात्र, विहिरीत मोठ्याप्रमाणात पाणी असल्याने आणि वेळ निघून गेल्याने दोन्ही मुलींचा जीव वाचवता आला नाही.



अखेर दोन्ही विद्यार्थिनींचे मृतदेह विहिरीतून मोठ्या शिताफीने बाहेर काढण्यात आले. डॉक्टरांनी तपासणीअंती त्यांचा बुडून मृत्यू झाल्याचे घोषित केले. घटनेची माहिती मिळताच भुसावळ पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. ग्रामस्थांच्या मदतीने संशयित आरोपी रोहन चौधरी याला ताब्यात घेण्यात आले आहे. प्राथमिक चौकशीत संशयित आरोपी माथेफिरू असल्याची माहिती पुढे येत आहे. मात्र, त्याने इतके टोकाचे पाऊल का उचलले? यामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलिसांकडून सखोल तपास सुरू आहे. दरम्यान, पोलिसांनी संशयिताविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या अमानुष आणि मन सुन्न करणाऱ्या घटनेने साकरी गाव अक्षरशः हादरून गेले आहे. गावातील शांत, ग्रामीण वातावरणावर एका (पान २ वर)

# राज्यात चारपैकी एक मूल लसीकरणापासून वंचित

## महाराष्ट्रात बाल लसीकरण ७३.६ टक्केच झाले पूर्ण; प्रत्यक्ष स्थिती आजही चिंताजनक!

वृत्तसंस्था । मुंबई

**बाल लसीकरण हे सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचा कणा मानले जाते. गोवर, पोलिओ, डिप्थेरिया, टिटॅनस, कुक्करखोकला, क्षयरोग यांसारख्या जीवघेण्या आजारांपासून बालकांचे संरक्षण करण्यासाठी लसीकरण अत्यावश्यक आहे. मात्र महाराष्ट्र आणि विशेषतः मुंबईसारख्या महानगरातही सर्व मुलांपर्यंत लसींचे संरक्षण पोहोचले आहे का? हा प्रश्न अजूनही पूर्णपणे सुटला नसल्याचे ताज्या शासकीय आकडेवारीतून स्पष्ट होते.**

राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण (एनएफएचएस-५) (२०१९ ते २१) नुसार महाराष्ट्रात १२ ते २३ महिन्यांच्या वयोगटातील मुलांपैकी केवळ ७३.६ टक्के बालकांचे पूर्ण लसीकरण झाले आहे. म्हणजेच राज्यातील सुमारे प्रत्येक चार मुलांपैकी एक मूल अजूनही सर्व आवश्यक लसींपासून वंचित आहे.



पूर्ण लसीकरणात बीसीजी, पोलिओचे तीन डोस, पेंटाव्हॅलेंट, डीपीटीचे डोस आणि गोवर किंवा एमआर लस यांचा समावेश होतो. राष्ट्रीय सरासरीच्या तुलनेत महाराष्ट्राचे हे प्रमाण किंचित कमी असून, 'आरोग्यदृष्ट्या प्रगत' मानल्या जाणाऱ्या राज्यासाठी ही बाब चिंतेची मानली जात आहे.मुंबईत परिस्थिती आणखी गुंतागुंतीची आहे. अत्याधुनिक रुग्णालये, मोठे वैद्यकीय जाळे आणि महापालिकेची सक्षम यंत्रणा असूनही, स्थलांतरित कुटुंबे, झोपडपट्ट्या, तात्पुरत्या वस्त्या आणि सतत बदलणारी लोकसंख्या यामुळे सर्व बालकांपर्यंत वेळेवर लसीकरण पोहोचवणे हे मोठे आव्हान ठरत आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत नियमित लसीकरण सत्रे, विशेष मोहिमा (पान २ वर)

● एनएफएचएस-५ च्या आकडेवारीनुसार राज्यात शहरी भागातील पूर्ण लसीकरणाचे प्रमाण सुमारे ७१७२ टक्के, तर ग्रामीण भागात सुमारे ७४७५ टक्के आहे. म्हणजेच शहरी भाग, विशेषतः महानगरे, ग्रामीण भागांपेक्षा मागे पडत असल्याचे चित्र समोर येते. आरोग्य तज्ज्ञांच्या मते, कामाच्या शोधात आलेली कुटुंबे, लसीकरण कार्ड हरवणे, पालकांमधील अपुरी माहिती, तसेच लसींबाबत असलेले गैरसमज यामुळे अनेक मुले वेळेवर लसीकरणापासून वंचित राहतात.

### ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमाचे निकाल जाहीर

# जळगाव जिल्हाधिकारी कार्यालय राज्यात प्रथम

प्रतिनिधी । जळगाव

**राज्य शासनाच्या मार्गदर्शनाखाली प्रशासन अधिक लोकाभिमुख, गतिमान, पारदर्शक व तंत्रज्ञानाधारित करण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या १५० दिवस कृती आराखडा मोहिमेत जळगाव जिल्हाधिकारी कार्यालयाने उल्लेखनीय कामगिरी करत राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे.**

भारतीय गुणवत्ता परिषद यांच्या मार्फत राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांचे सात सर्वंकष निकषांवर मूल्यमापन करण्यात आले असून या मूल्यमापनात जळगाव जिल्हाधिकारी कार्यालयास २०० पैकी १८८ गुण प्राप्त झाले आहेत. प्रजासत्ताक दिनी या निकालाची घोषणा करण्यात आली.

या मोहिमे अंतर्गत नागरिकांना शासकीय सेवा सुलभ, जलद व वेळेत उपलब्ध करून देणे, उद्योगांना प्रोत्साहन देणे तसेच (पान २ वर)

# संपादकीय

## युनोतील सुधारणा

युनो म्हणजेच संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षा परिषदेतील सुधारणा गरजेच्याच नाही तर अत्यावश्यक असल्याचे मत युनोचे सरचिटणीस एन्टोनिया गुटेरस यांनी पुन्हा एकदा व्यक्त केल्याने विद्यमान अशांत जागतिक वातावरणाच्या पार्श्वभूमीवर हा विषय पुन्हा चर्चेला येणे क्रमप्राप्त आहे. एकीकडे जागतिक टॅरिफ पॉलिसीच्या निमित्ताने अमेरिका आपला आर्थिक दहशतवाद पसरू पाहात आहे, दुसरीकडे रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्ध थांबायचे नाव घेत नाही. त्यातच अमेरिकेने इराणवर हल्ला करण्याचे संकेत दिले आहेत आणि ग्रीनलँडसारख्या छोट्या देशावरही आपली नजर ठेवली आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संघर्ष आणि अस्वस्थता कायम आहे. बांगलादेशमध्ये अस्वस्थता आणि अशांती कायम आहे. पॅलेस्टाइन आणि इस्रायल यांच्यातील संघर्ष तर कधीच थांबणार नाही अशी लक्षणे दिसत आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर जागतिक शांततेसाठी निर्माण करण्यात आलेली युनो ही संघटना आणि या संघटनेची महत्त्वाची उपसंघटना असलेली सुरक्षा परिषद काय करते हे ठरवणे निश्चितच महत्त्वाचे आहे. अमेरिकेने यापूर्वीच आपला युनोशी संबंध तोडून टाकला आहे, युनो आमच्यावर नियंत्रण ठेवू शकत नाही आणि युनोचा आमच्याशी काही संबंध नाही, असे अमेरिकेचे विद्यमान अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अनेक वेळा सांगितले आहे. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या कालावधीमध्ये आण्विक युद्धानंतर जागतिक पातळीवर जी असुरक्षितता निर्माण झाली होती त्या पार्श्वभूमीवर युनोसारख्या संघटनेकडून मोठ्या प्रमाणात अपेक्षा होत्या. जागतिक शांततेसाठी काम करणे हेच या संघटनेचे ध्येय होते. पण गेल्या ७५ वर्षांच्या कालावधीमध्ये जगात सर्वत्रच लष्करी संघर्ष झाले आहेत आणि ते थांबवण्यात किंवा कमी करण्यात युनोच्या सुरक्षा परिषदेला यश आलेले नाही. कारण, प्रत्येक देशाचे आपले स्वतःचे धोरण असल्यामुळे युनोचे जरी सर्व देश सदस्य असले तरी सुरक्षा परिषदेच्या व्यासपीठावर मात्र प्रत्येकाची भूमिका वेगळी असू शकते. विशेषतः सुरक्षा परिषदेचे जे पाच कायमस्वरूपी स्थायी सदस्य आहेत त्यामध्ये अमेरिका, चीन, फ्रान्स, रशिया आणि युनायटेड किंगडम यांचा समावेश आहे. पण या सदस्यांकडे नकाराधिकार असल्यामुळे जागतिक पातळीवर कोणताही विषय चर्चेला आला किंवा त्यावर निर्णय घेण्याची वेळ आली तर आपला अधिकार वापरून तो महत्त्वाचा निर्णय रोखण्याचे काम हे देश करू शकतात. जगातील इतर देशांवर अप्रत्यक्षपणे नियंत्रण ठेवण्याचे काम या पाच देशांकडून होते. पण दुसरीकडे भारतासारख्या लोकशाही देशाला मात्र युनोच्या कायमस्वरूपी किंवा स्थायी सदस्यत्वाचा मान अद्याप मिळालेला नाही. गेले अनेक वर्षे भारत याबाबत मागणी करत आहे. पूर्वीच्या प्रत्येकच युनोच्या सरचिटणीसांनी भारताच्या योगदानाचे कौतुक केले असले, तरी स्थायी सदस्य म्हणून भारताला अद्याप स्थान देण्यात आलेले नाही. विद्यमान सरचिटणीस गुटेरस यांना अपेक्षित असलेल्या सुधारणा जर लक्षात घ्यायच्या असतील तर त्यामध्ये स्थायी सदस्यांना मिळणाऱ्या नकाराधिकाराचा पुनर्विचार किंवा भारतासारख्या मोठ्या देशांना स्थायी सदस्यत्व देणे हेच विषय प्रामुख्याने चर्चेला येणे गरजेचे आहे. जगाच्या एकूण लोकसंख्येपैकी जवळपास २० टक्के लोकसंख्येचे प्रतिनिधित्व करणाऱ्या भारताला युनोच्या सुरक्षा परिषदेमध्ये अधिक मान आणि अधिकार मिळणे क्रमप्राप्त आहे. स्थायी सदस्यांच्या व्हेटो अधिकाराचा पुनर्विचार असो किंवा नवीन मोठ्या देशांना स्थायी सदस्यत्व देण्याचा विषय असो या व्यतिरिक्त युनोचा प्रभाव वाढवण्यासाठी इतरही अनेक उपाय करणे गरजेचे आहे. अमेरिकेसारखे मोठे देश जेव्हा युनोला किंवा युनोच्या सुरक्षा परिषदेला अजिबात किंमत देत नाहीत तेव्हा अमेरिकेच्या प्रभावाखाली असलेले इतरही देश त्याच प्रकारचे वर्तन करतात असेच आजवर सिद्ध झाले आहे. परिणामी ७५ वर्षांच्या काळात युनो पूर्णपणे निष्प्रभ झाली आहे. खरे तर युनो या मुख्य संघटनेच्या ज्या अनेक भगिनी संघटना आहेत त्यापैकी युनिसेफ असोत किंवा इतर काही संघटना असो त्या अत्यंत कार्यक्षमपणे काम करताना दिसतात. पण जागतिक सुरक्षेचा आणि शांततेचा विचार करण्यासाठी जी महत्त्वाची युनोची संघटना आहे ती म्हणजे सुरक्षा परिषद मात्र संपूर्णपणे प्रभावहीन आणि अधिकारहीन झाल्याचे दिसून येते.

# जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबध्द : पालकमंत्री

## भारतीय प्रजासत्ताकदिनाचा मुख्य शासकीय समारंभ उत्साहात



**प्रतिनिधी । जळगाव**

**जिल्हयातील शेतकरी, कष्टकरी, महिला, युवक, आदिवासी गोरगरिब, कामगार, ज्येष्ठ नागरिक या सर्व घटकांचा सन्मान राखत त्यांना पुढे नेण्याचा आमचा संकल्प असून जळगाव जिल्हयाच्या सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबध्द आहे, असे प्रतिपादन राज्याचे स्वच्छता व पाणी पुरवठामंत्री तथा जिल्हयाचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केले.**

भारतीय प्रजासत्ताक दिनाचा मुख्य शासकीय समारंभ जळगाव पोलीस कवायत मैदान येथे पार पडला. यावेळी पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्याहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. समारंभास जिल्हाधिकारी रोहन घुगे, जिल्हा परिषद मख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ.महेश्वर रेड्डी, मनपा आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री गुलाबराव पाटील पुढे बोलतांना म्हणाले की, आजचा दिवस आपल्या मातृभूमीसाठी बलिदान दिलेल्या हुतात्म्यांना वंदन करण्याचा पवित्र दिवस आहे. छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांमुळेच आपण आज हा दिवस अनुभवतो आहोत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत आहे की, जोपर्यंत समाजातील शेवटच्या व्यक्तीला न्याय मिळत नाही, तोपर्यंत आपले कार्य अपूर्ण आहे. या विचाराने प्रेरित होऊन समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत विकास पोहोचवण्याचा आमचा संकल्प आहे. जळगाव जिल्हा केवळ केळी व प्लास्टिकसाठीच नव्हे तर सुवर्ण व्यवसाय, कापूस, डाळ उत्पादन आणि सांस्कृतिक वारशासाठीही ओळखला जातो. जिल्ह्याच्या या प्रगतीचा आलेख मांडताना मला अभिमान वाटतो, असेही ते यावेळी म्हणाले.

महिला व बालकल्याण विभागासाठी छत्रपती संभाजी नाट्यगृहाशेजारी महिला व बाल विकास भवन उभारण्यात आले असून जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, बाल विकास प्रकल्प अधिकारी, महिला आर्थिक विकास महामंडळ, बाल संरक्षण कक्ष, महिला सक्षमीकरण केंद्र आणि चाईल्ड लाईन ही सर्व कार्यालये एकाच छताखाली कार्यान्वित होत आहेत, त्यामुळे योजनांची अंमलबजावणी अधिक सुलभ होत आहे. जलजीवन योजनेमुळे ग्रामीण भागात प्रत्येक घराला शुध्द पिण्याचे पाणी देण्याचे उद्दिष्ट साध्य होत आहे. जल जीवन मिशन अंतर्गत ६ लाख ९० हजार ७८५ कुटूंबांना नळजोडणी देण्यात आलेली असून १ हजार ८० गावे हर घर जल घोषित झाली आहेत.



स्वच्छ भारत मिशन अंतर्गत या वर्षात २ हजार ६५९ वैयक्तीक शौचालयांची कामे पूर्ण झाली असून २ हजार २८५ लाभार्थ्यांना अनुदान वितरीत करण्यात आले असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

**आदिवासीच्या विकासाला चालना**

यावल येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पा अंतर्गत पेसा क्षेत्रातील ६० गावे व २५ पाड्यांचा समावेश असून ६ लाख ४ हजार नागरिकांसाठी शिक्षण, आरोग्य, पोषण व रोजगाराच्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. आदिवासी युवक-युवतींच्या कौशल्य व रोजगारासाठी स्पाईस क्लस्टर, स्वयंरोजगार व न्युक्लिअस बजेट योजना राबविण्यात येत आहेत. ५०० शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसाठी जैन इरिगेशनसोबत सामंजस्य करार करण्यात आला असून राणी दुर्गावती योजनेत महिलांना १०० टक्के अर्थसहाय्य, वनहक्क कायद्यांतर्गत हजारो आदिवासी कुटूंबांना हक्कपत्रे देण्यात आली आहेत. राज्य शासनाच्या १०० दिवस कार्यक्रमात एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाला राज्यात प्रथम क्रमांक मिळालेला असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. अनुसूचित जाती घटक कार्यक्रमात ९३ कोटी निधी मंजूर असून रमाई आवास योजनेत २ हजार ८७२ लाभार्थ्यांसाठीच्या घरकुलांना ३५ कोटी ६० लक्ष ७० हजार निधीस मंजुरी देण्यात आली आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेत ३३४ वस्त्यांसाठी ४४ कोटी रकमेची विकास कामे सुरु आहेत.

प्रधानमंत्री आदर्श ग्राम योजनेंतर्गत ८ गावांमध्ये विकास कामे सुरु असून जिल्ह्यातील १२ वसतिगृहांत ९४५ विद्यार्थी व अनुसुचित जातींसाठी निवासी शाळेत २०० विद्यार्थी मोफत सुविधा घेऊन शिक्षण घेत आहेत. राज्य शासनाच्या १०० दिवस कार्यक्रमात जिल्हा समाजकल्याण कार्यालयाला राज्यात प्रथम पुरस्कार मिळाला आहे. जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाच्या माध्यमातून जिल्हा स्तरावर टेलिमेडिसिन कक्ष सुरु करण्यात आला असून, या कक्षाच्या माध्यमातून गर्भवती मातांना आरोग्यच्या सोयी पुरविण्यावर भर दिला जात असून आतापर्यंत जवळपास ५ हजार पेक्षा जास्त महिलांना याचा फायदा झाला आहे.

जिल्ह्याला औद्योगिकदृष्ट्या 'डी-प्लस' दर्जा प्राप्त झाल्यामुळे येथे नव्या उद्योगांना मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध होणार आहे. राज्याच्या नवीन औद्योगिक धोरणामुळे जळगाव जिल्ह्याला औद्योगिक क्रांतीची सुवर्णसंधी मिळाली असून यामुळे जिल्ह्याच्या विकासाला मोठी चालना मिळेल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

**परेड संचलन, सांस्कृतीक कार्यक्रमांचे सादरीकरण**

पोलीस कवायत मैदानावर आयोजित संचालनात स्काऊट गाइड, एनसीसी, एनएसएस, पुरुष-महिला पोलीस पथक, होमगार्ड, पोलीस बँड पथक, अग्निशमन दलाच्या जवानांसह आरोग्य सेवा, चित्ररथ परेडचा सहभाग होता. तसेच विविध शालेय विद्यार्थ्यांनी लेझीम, योगासह विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण केले.

### ● शेतकऱ्यासांठी महत्त्वपुर्ण निर्णय

**प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सन २०२४-२५ मध्ये खरीप व रब्बी हंगामात ५९ कोटी ८९ लाख भरपाई थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आली आहे. पुनर्रचित हवामानाधारित फळपीक विमा योजनेतून अंबिया बहार हंगामात ५३३ कोटी ४८ लाख अनुदान शेतकऱ्यांना देण्यात आले आहे. 'प्रति थेंब अधिक पीक' योजनेतून सन २०२४-२५ मध्ये आजतागायत ६० कोटी ९९ लाख इतके अनुदान शेतकऱ्यांच्या खात्यावर थेट जमा झाले आहे. अतिवृष्टी व अवकाळी पावसासाठी ४२५ कोटी ५६ लाख मदतीची मागणी शासनाकडे करण्यात आली आहे. कृषी यांत्रिकीकरणातून ११ कोटी ८८ लाख अनुदान देण्यात आले आहे. प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजनेत ३६३ प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली असून आत्मा योजनेमध्ये १ कोटी ६५ लाख निधी खर्च करण्यात आला आहे. जिल्ह्यामध्ये मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी अंतर्गत १५३ उपकेंद्र मंजूर असून त्यांची क्षमता ८५० मेगावॅट इतकी आहे. त्यापैकी ४० उपकेंद्रांमध्ये १२० मेगावॅट एवढी सौरउर्जाद्वारे वीज निर्मिती होत असून ६० हजार कृषी ग्राहक शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा उपलब्ध होत असल्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी सांगितले.**

### ➤ विविध विभागातील अधिकाऱ्यांना पुरस्कार वितरण

**यावेळी जिल्हा सैनिक कल्याण विभागाच्यावतीने ध्वज निधी संकल्प योजनेतंर्गत ध्वज निधी संकलनासाठी केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल जिल्हाधिकारी रोहन घुगे यांना स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित केले. पोलीस, वनविभाग, पशुसंवर्धन, समाजकल्याण, महानगरपालिका, शिक्षण या विभागांना पालकमंत्र्यांच्या हस्ते स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. क्रीडा विभागाअंतर्गत विविध गुणवंत खेळाडुंचा तसेच कृषी विभाग अंतर्गत उत्कृष्ट शेतीशाळा आयोजन स्पर्धा, उत्कृष्ट पीक प्रात्याक्षित गटात कृषी विभागाच्या तालुकास्तरीय अधिकाऱ्यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.**

# पान १ वरुन

**जिल्ह्यात गारपिटीसह......**

अवकाळी पावसामुळे अक्षरशः कोलमडून पडला आहे. अनेक शेतकऱ्यांनी कर्ज काढून शेती केली होती. हाता-तोंडाशी आलेला घास निसर्गाच्या रुद्र तांडवात हिरावून गेला. भिजलेली रब्बी पिके पाहताना शेतकऱ्यांच्या डोळ्यांत अश्रू तरळत होते, मेहनतीवर पाणी फिरल्याची वेदना त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होती. विशेषतः कापणीस तयार असलेली पिके भिजल्याने उत्पादनात मोठी घट होण्याची भीती व्यक्त केली जात असून अनेक कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

**साकरीत दोन अल्पवयीन......**

क्षणात काळी छाया पसरली आहे. प्रत्येकाच्या मनात भीती आणि अस्वस्थता निर्माण झाली आहे. निष्पाप, शिकण्याच्या वयातील शालेय विद्यार्थिनींना अशा क्रूर पद्धतीने मृत्यूला सामोरे जावे लागणे ही बाब गावकऱ्यांसाठी अत्यंत धक्कादायक आणि संतापजनक आहे. घटनेनंतर संपूर्ण गावात शोककळा पसरली आहे. अनेक घरांमध्ये भीतीचे आणि दुःखाचे वातावरण आहे. या घटनेमुळे विशेषतः मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. सकाळच्या वेळेत शाळा, कॉलेज किंवा शिकवणीसाठी जाणाऱ्या मुलींना अनेकदा ओसाड रस्ते, शेतशिवारातून मार्ग काढावा लागतो. अनेक पालकांमध्ये आपल्या मुलींना एकट्याने बाहेर पाठवण्याबाबत भीती निर्माण झाली आहे. भविष्यात मुलींच्या शिक्षणावर याचा विपरीत परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**राज्यात चारपैकी एक......**

आणि पोलिओ ड्राइव्ह राबवण्यात येतात तरीही काही भागांत 'ड्रॉपआउट' म्हणजे एक-दोन डोस घेतल्यानंतर पुढील डोस न मिळण्याचे प्रमाण अजूनही दिसून येते. केंद्र सरकारकडून सुरू करण्यात आलेल्या मिशन इंद्रधनुष्य आणि इंटेन्सीफाईड मिशन इंद्रधनुष्य या योजनांचा उद्देश प्रत्येक बालकापर्यंत लसीकरण पोहोचवणे हा आहे. या मोहिमांमुळे काही जिल्ह्यांमध्ये कव्हरेज वाढल्याचे दिसले असले तरी महाराष्ट्रात अद्याप ९० टक्क्यांहून अधिक पूर्ण लसीकरणाचे लक्ष्य गाठता आलेले नाही. आरोग्य मंत्रालयाच्या अहवालांनुसार, कोविड-१९ काळात नियमित लसीकरणात खंड पडल्याचा परिणामही अद्याप पूर्णपणे भरून निघालेला नाही.

**जळगाव जिल्हाधिकारी कार्यालय......**

शासकीय कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढविणे ही प्रमुख उद्दिष्टे ठेवण्यात आली होती. या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयाने संकेतस्थळ आधुनिकीकरण, 'आपले सरकार' प्रणालीची प्रभावी अंमलबजावणी, ई-ऑफिसचा १०० टक्के वापर, डिजिटल डॅशबोर्ड, व्हॉट्सॲप चॅटबॉट सेवा, कृत्रिम बुद्धिमत्ता व GIS तंत्रज्ञानाचा नाविन्यपूर्ण वापर आदी विविध उपक्रम यशस्वीपणे राबविले. जिल्हाधिकारी कार्यालयाचे अधिकृत संकेतस्थळ jalgaon.gov.in हे अद्ययावत, जलद व नागरिकाभिमुख स्वरूपात विकसित करण्यात आले असून ते मोबाईलसह सर्व उपकरणांवर सुसंगत करण्यात आले आहे. मराठी भाषेतील माहिती, -I आधारित भाषांतर सुविधा, दिव्यांगांसाठी प्रवेशयोग्यता, सायबर सुरक्षा व मानकांचे पालन यामुळे नागरिकांना शासकीय माहितीपर्यंत सुरक्षित व सुलभ प्रवेश मिळत आहे. यामुळे पारदर्शकता वाढून नागरीकांना प्रत्यक्ष कार्यालयीन भेटींची आवश्यकता लक्षणीयरीत्या कमी झाली आहे. 'आपले सरकार' पोर्टलवर १९ अधिसूचित सेवा पूर्णतः ऑनलाइन उपलब्ध करून देण्यात आल्या असून अर्ज स्वीकृतीपासून निर्णय व सेवा वितरणापर्यंतची संपूर्ण प्रक्रिया डिजिटल पद्धतीने राबविण्यात येत आहे.

**जळगावचे महापौर-उपमहापौर......**

यांनी यासंदर्भातील अधिकृत निर्देश दिले आहेत. नुकत्याच झालेल्या निवडणुकांनंतर आता सर्वांचे लक्ष या पदांच्या निवडीकडे लागले आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदींनुसार ही निवडणूक प्रक्रिया पार पडणार आहे. विभागीय आयुक्तांचे प्रतिनिधी म्हणून जळगावचे जिल्हाधिकारी रोहन घुगे यांची या बैठकीसाठी 'पीठासीन अधिकारी' म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

## महावितरणची आढावा बैठक उत्साहात

**प्रतिनिधी । जळगाव**

महावितरण विभागाकडील सर्व विषयांची एकत्रित आढावा बैठक नुकतीच जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली. या बैठकीत विभागाद्वारे राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची सद्यस्थिती, प्रलंबित कामकाज तसेच अंमलबजावणीतील अडचणी याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच या बैठकीत वीजपुरवठा, देखभाल-दुरुस्ती, नवीन जोडण्या, ग्राहक सेवा तसेच योजनेनिहाय प्रगती या बाबत सर्वंकष आणि सखोल आढावा घेण्यात आला.

विभागीय अधिकारी व कर्मचारी यांनी प्रलंबित कामांची माहिती देत प्रलंबीत कामे तात्काळ पुर्ण कराव्यात. नागरिकांना सुरळीत, सुरक्षित व दर्जेदार वीजपुरवठा सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने संबंधित अधिकाऱ्यांना पुढील कार्यवाहीबाबत स्पष्ट निर्देश देण्यात आले. बैठकीत जिल्ह्यातील वीजविषयक सेवा अधिक सक्षम, पारदर्शक व कार्यक्षम करण्यावर विशेष लक्ष देण्यात यावे अशा सुचना जिल्हाधिकारी श्री. घुगे यांनी यावेळी दिल्या.

यावेळी महावितरण विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# पंकज विद्यालयाची 'चला जाणूया वनाला' उपक्रमांतर्गत निसर्ग सहल उत्साहात

**प्रतिनिधी । चोपडा**

**येथील सामाजिक वनीकरण विभाग व पंकज विद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने 'चला जाणुया वनाला' या विशेष उपक्रमांतर्गत इयत्ता ८ वी आणि ९ वीच्या विद्यार्थ्यांची एक दिवसीय निसर्ग सहल नुकतीच उत्साहात पार पडली. सामाजिक वनीकरण विभागातील वनक्षेत्रपाल सविता सोनवणे आणि सर्व कार्यालयीन अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने आयोजित सहलीत विद्यार्थ्यांनी निसर्गाचा जवळून अनुभव घेत जैवविविधतेची माहिती जाणून घेतली.**




पक्षी निरीक्षणाने सहलीचा प्रारंभ झाला. सहल चमूने सर्वप्रथम शिरपूर जवळील अरणावती धरण आणि हाडाखेड परिसराला भेट दिली. याठिकाणी हिवाळ्याच्या पार्श्वभूमीवर मोठ्या संख्येने आलेल्या देशी-विदेशी पक्ष्यांचे विहंगम दर्शन विद्यार्थ्यांना घडले. प्रसिद्ध पक्षीमित्र योगेश वारूळे यांनी यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी विविध पक्ष्यांच्या जाती, त्यांचे स्थलांतर आणि अधिवास याबद्दल सखोल माहिती दिली. दुर्बिणीच्या साहाय्याने पक्षी पाहताना विद्यार्थ्यांमध्ये मोठा उत्साह दिसून आला.

पक्षी निरीक्षणानंतर विद्यार्थ्यांनी परिसरातील प्राचीन नागेश्वर मंदिराला भेट दिली. निसर्गरम्य वातावरणात असलेल्या या मंदिराच्या परिसरातील शांततेचा विद्यार्थ्यांनी अनुभव घेतला.

या सहलीत इयत्ता ८ वी आणि ९ वीचे एकूण ४३ विद्यार्थी सहभागी झाले होते. मुख्याध्यापक व्ही.आर.पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यालयाच्या हरित सेनेचे प्रमुख परमेश्वर पाटील, विनोद जाधव आणि वैशाली पाटील यांनी या उपक्रमाचे यशस्वी नियोजन केले. या उपक्रमामुळे पुस्तकी ज्ञानापलीकडे जाऊन निसर्गाशी नाते जोडण्याची संधी मिळाल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले. निसर्ग पर्यटन सहलीसाठी येथील सामाजिक वनीकरण विभागातील वनपरिक्षेत्र अधिकारी सविता सोनवणे, वनपाल तुषार देवरे,कविता पाटील, अस्मिता पगार , रवींद्र भामरे, जयश्री धनगर, दीपक कोळी, अंकुश भिल यांचे मार्गदर्शनपर सहकार्य लाभले. संस्थाध्यक्ष पंकज बोरोले यांच्या मार्गदर्शनाखाली 'चला जाणूया वनाला' या उपक्रमाचे यशस्वी नियोजन करण्यात आले होते.

### ➤ पर्यावरण संवर्धनाचा धडा

**सहलीचा मुख्य आकर्षण ठरला तो म्हणजे 'वड-पिंपळ वृक्ष लागवड प्रकल्प' भेट. या प्रकल्पाच्या माध्यमातून वृक्षांचे महत्त्व आणि पर्यावरण संतुलनासाठी वृक्षारोपण किती गरजेचे आहे, हे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीतून समजले. ४३ विद्यार्थ्यांच्या या चमूने प्रकल्पातील विविध रोपट्यांची पाहणी केली आणि पर्यावरण रक्षणाची शपथ घेतली.**

### निसर्गाच्या कुशीत वनभोजन

**दिवसभराच्या फिरस्तीनंतर दुपारी सर्व विद्यार्थी आणि शिक्षकांनी निसर्गाच्या सानिध्यात बसून वनभोजनाचा आनंद लुटला. निसर्गाच्या सानिध्यात एकत्र बसून जेवणाचा आनंद काही वेगळाच होता, अशा भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केल्या.**

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक – सागर काशिनाथ ओतारी (मोबा.– ९९७००५३०६६) व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी –३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव –४२५००१ येथे छापून शॉप नं. ई–१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव– ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✲ कार्यकारी संपादक – किशोर शंकर शिंपी (✲ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७–२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com



# धुळे जिल्हा आत्मनिर्भर, बलशाली घडविणार

## पालकमंत्री जयकुमार रावल यांचे प्रतिपादन; प्रजासत्ताक दिनानिमित्त मुख्य शासकीय ध्वजारोहण समारंभ उत्साहात

प्रतिनिधी । धुळे

**देशाला सन २०४७ पर्यंत म्हणजेच भारतीय स्वातंत्र्याच्या शताब्दी वर्षात विकसित भारत घडविण्याचे ध्येय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांसमोर ठेवले आहे. हे ध्येय साकारण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आत्मनिर्भर आणि बलशाली धुळे जिल्हा घडविण्याचा संकल्प करण्यात येत आहे, असे प्रतिपादन राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी केले.**

भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त पोलीस कवायत मैदानावर मुख्य शासकीय ध्वजारोहण समारंभ पार पडला. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी खा.डॉ.शोभा बच्छाव, आ.अनुप अग्रवाल, राघवेंद्र पाटील, जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अजिज शेख, जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, मनपा आयुक्त नितीन कापडणीस, अपर जिल्हाधिकारी सुभाष बोरकर, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे, निवासी उपजिल्हाधिकारी शरद पवार, उपजिल्हाधिकारी संदीप पाटील, जिल्हा पुरवठा अधिकारी महादेव खेडकर, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी डॉ.निलेश पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा धरती देवरे, माजी महापौर जयश्री अहिरराव, चंद्रकांत सोनार, डॉ.सुशिल महाजन, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष प्रविण चौरे, भाजपा शहराध्यक्ष गजेंद्र अंपळकर, रमेश श्रीखंडे, रणजित भोसले यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

पुढे बोलतांना पालकमंत्री जयकुमार रावल म्हणाले की, धुळे जिल्ह्यात नरडाणा येथे औद्योगिक वसाहत तसेच शिरपूर, दोंडाईचा येथे विविध उद्योग, व्यवसाय कार्यरत आहेत. साक्री येथे सौर ऊर्जा प्रकल्प, पवन ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित आहेत. आपल्या जिल्ह्यातील सिंचन क्षेत्रात अक्कलपाडा, सुलवाडे, अमरावती, सोनवदसह विविध धरणांमध्ये पाण्याचा मुबलक साठा आहे. कुशल मनुष्यबळ आहे. या जिल्ह्यातून सहा राष्ट्रीय महामार्ग जातात. धुळे व शिरपूर येथे विमानतळ आहे. तसेच ऐतिहासिक किल्ले व पर्यटनस्थळे ही धुळे जिल्ह्याची बलस्थाने आहेत. या सर्व घटकांच्या बळावर जिल्ह्याची सकारात्मक प्रतिमा निर्माण करण्यासाठी सर्वांचे सहकार्य आवश्यक आहे, असे ते यावेळी म्हणाले.



### ➤ सुलवाडे-जामफळ उपसा सिंचन योजना ठरणार गेमचेंजर

तापी नदीवरील सुलवाडे जामफळ उपसा सिंचन योजना आकार घेत आहे. ही योजना आपल्या जिल्ह्याचा चेहरा-मोहरा बदलणारी ठरणार आहे. या प्रकल्पावर पाच हजार ३२९ कोटी रुपये खर्च होणार आहे. बोरविहीर ते नरडाणा दरम्यान, लोहमार्ग टाकण्यास सुरूवात झाली आहे. बोरविहीर ते नरडाणा रेल्वे मार्गाच्या करून देण्यात आले आहे. राज्य शासन शेतकऱ्यांच्या भूसंपादनासाठी धुळे तालुक्यातील बोरविहीर ते सोनगीर या ३९ किलोमीटर लांबीच्या मार्गाचे भूसंपादन पूर्ण करण्यात आले आहे. या मार्गाचे काम प्रगतीपथावर सुरू आहे. तसेच मनमाड इंदूर रेल्वे मार्गसाठी शिंदखेडा तालुक्यातील आठ व शिरपूर तालुक्यातील १४ गावांमधून जाणार असून त्याचेही भूसंपादन प्रगतीपथावर आहे. या सर्व बाबी असताना आता आपण थांबायचं नाही, तर विकासाकडे वाटचाल करायची आहे, असेही ते यावेळी म्हणाले.

## थोडक्यात

### मोरदड तांडा आश्रमशाळेत स्नेहसंमेलन उत्साहात

**धुळे ।** तालुक्यातील मोरदड तांडा येथील कै. वसंतराव नाईक शिक्षण प्रसारक मंडळ संचलित प्राथमिक, माध्यमिक आश्रम शाळा व कै. दलपतभाऊ राठोड कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयात येथे वार्षिक स्नेहसंमेलन व सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात पार पडला. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष बळीराम राठोड हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून सहाय्यक संचालक सुभाष फड, निरीक्षक शशांक जाधव, संजय उपाध्ये, खजिनदार रमेश राठोड, सचिव रवींद्र राठोड, योगेश चव्हाण, मुख्याध्यापक प्रमोद रायते, प्राचार्य विजय चौधरी आदी उपस्थित होते. स्नेहसंमेलनात विविध नृत्य प्रकार, नाटिकांचे सादरीकरण करण्यात आले. त्यात १०० पेक्षा जास्त विद्यार्थी सहभागी झाले होते.

### ट्रक चालक, मालकांची आरोग्य तपासणी

**बोराडी ।** धुळे-पळासनर टोलवेज प्रा. लि.च्या माध्यमातून शिरपूर टोल प्लाझाजवळ ट्रक चालक आणि मालकांसाठी मोफत नेत्र व आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. रस्ते सुरक्षा आणि चालकांच्या आरोग्याप्रति जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. शिबिरात ८५ ट्रक चालकांनी सहभागी होत आपल्या आरोग्याची आणि डोळ्यांची मोफत तपासणी करून घेतली. यावेळी ७० चालकांना मोफत संरक्षक चष्म्यांचे वाटप करण्यात आले. तसेच वाढत्या थंडीच्या पार्श्वभूमीवर निलेश गुप्ता यांच्यावतीने चालक आणि इतर गरजूंना १०० ब्लँकेटचे वाटप करण्यात आले.

### प्रवासी महासंघातर्फे चालक दिन साजरा

**चिनोदा, ता.तळोदा ।** तळोदा तालुका प्रवासी महासंघ व ग्राहक पंचायत शाखा तळोदा व अक्कलकुव्वा यांच्यातर्फे अक्कलकुव्वा आगारात चालक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रवाशांना उत्कृष्ट सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सत्कार करण्यात आला. त्यानंतर प्रवासी महासंघातर्फे प्रवाशांच्या विविध सोयी सुविधांबाबत आगारप्रमुखांना विविध मागण्याचे निवेदन देण्यात आले. निवेदनात, नंदुरबारहून तळोदा शैक्षणिक, सामाजिक, व्यापारी, राजकीय व इतर प्रयोजनासाठी गेलेल्या प्रवाशांना परत येण्यासाठी रात्रीची बस नसल्याने प्रवाशांची मोठी गैरसोय होते. तरी रात्री नऊ तीसची नंदुरबार-तळोदा बस सुरू करण्यात यावी, नंदुरबार येथे येण्या-जाण्यासाठी बसेसची संख्या वाढविण्यात यावी, आदी मागण्या करण्यात आल्या आहेत.

# धरणगाव येथे संत तुकाराम महाराज जयंतीनिमित्त कीर्तन सोहळा



प्रतिनिधी । धरणगाव

**येथे संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज जयंती व वसंत पंचमीच्या निमित्ताने समस्त कुणबी पाटील समाज पंच मंडळ, लहान माळीवाडा व समस्त नाथभक्त परिवार धरणगाव ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य जाहीर कीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.**

या सोहळ्यात नवनाथ कथाकार ह.भ.प. गणेश महाराज कुदळे यांनी संत तुकाराम महाराजांचे जीवनकार्य, भक्तीमार्ग व नवनाथ परंपरेचे महत्त्व प्रभावीपणे मांडले. कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती परमपूज्य गुरुवर्य बालकनाथजी महाराज यांची होती. त्यांनी जीवब्रम्ह सेवा हाच खरा परमार्थ असे मार्गदर्शन केले.

याप्रसंगी नामघोष, अभंग व भक्तिगीतांनी परिसर भक्तीमय झाला. कार्यक्रमात विविध कीर्तनकार व कलाकारांचा शाल-श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक लक्ष्मणराव पाटील यांनी तर आभार गणेश पाटील यांनी मानले.

कार्यक्रमास परिसरातील भाविकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. हा कीर्तन सोहळा अत्यंत भक्तिभावपूर्ण वातावरणात पार पडला.

### शिरपूर येथे ३१ रोजी कुस्ती स्पर्धेचे आयोजन

प्रतिनिधी । शिरपूर

येथील केसरीनंदन बहुउद्देशिय संस्थेतर्फे शनिवार, दि.३१ रोजी दुपारी ४ वाजता पित्रेश्वर रिक्षा स्टॉप गरबा मैदानावर शिरपूर केसरी कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. कुस्तीचा प्रसार, प्रचार व्हावा तसेच स्थानिक कुस्तीपटूंना प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. १२ वर्ष आतील, १४ वर्षातील, १७ वर्ष आतील मुले आणि खुला अशा गटात या स्पर्धा होणार आहेत.

# सनपुलेत श्री कालभैरव ज्येष्ठ नागरिक संघ कार्यालयाचे उद्घाटन

प्रतिनिधी । चोपडा

तालुक्यातील सनपुले येथील श्री. कालभैरव ज्येष्ठ नागरिक संघ कार्यालयाचे उद्घाटन जळगाव जिल्हा समन्वय समिती चे पश्चिम विभागाचे अध्यक्ष विजय करोडपती, सचिव जयदेव देशमुख व संघटक प्रमोद डोंगरे यांच्या शुभहस्ते ज्येष्ठ नागरिक संघाचे संस्थापक कै.राधाकृष्ण भट्ट यांच्या फोटोचे अनावरण करण्यात आले.

तसेच सनपुले येथील संघाचे अध्यक्ष व्ही.के.पाटील यांनी संस्थेचे रजिस्ट्रेशन तात्काळ केले त्याबद्दल त्यांच्या कार्यकाळाचा गुणगौरव करण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष भास्कर गुरुजी, सचिव पीतांबर सोनवणे, मच्छिंद्र पाटील, साहेबराव कोळी, छगन पाटील, पांडुरंग पाटील आणि इतर ग्रामस्थ उपस्थित होते.



# नूतन विद्यालयात प्रजासत्ताक दिन, बक्षीस वितरण उत्साहात

प्रतिनिधी । शिंदखेडा

तालुक्यातील धमाने येथील नूतन माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात प्रजासत्ताक दिन व वार्षिक कार्यक्रमांचा बक्षीस वितरण सोहळा उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष आर.डी. पाटील हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून मुख्याध्यापक व्ही. जी. पाटील, सरपंच साखरबाई सोनवणे, उपसरपंच प्रमिलाबाई गिरासे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक जिजाबराव सोनवणे, ग्रामपंचायत सदस्य आबा मुंडे, माजी सैनिक प्रकाश पाटील, पंचायत समिती सदस्य दुल्लभ सोनवणे, निळकंठ पाटील, केशवराव पाटील आदी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन करून करण्यात आली. त्यानंतर मान्यवरांच्याहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गितांवर आधारित कवायत संचलन, डंबेल्सचे प्रात्यक्षिक सादर केले.



नूतन विद्यालय व विशाल माळी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात शैक्षणिक, सांस्कृतिक व क्रीडा स्पर्धांमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना बक्षीस देऊन गौरविण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले तसेच देशभक्तीपर गीते सादर केली. कार्यक्रमाला धमाने व कुरुकवाडे परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक-शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# मोबाईलच्या स्क्रीनवरून थेट क्रिकेट मैदानात उतरली धरणगावची तरुणाई; प्रीमियर लीग टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा उत्साहात

प्रतिनिधी । धरणगाव

शहरात आयोजित करण्यात आलेल्या धरणगाव प्रीमियर लीग टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेने शहरासह परिसरातील क्रीडाप्रेमींमध्ये नवचैतन्य निर्माण केले. ज्योतीदेवी क्रिकेट क्लब यांच्या वतीने आयोजित या स्पर्धेत तरुणांनी मोबाईल गेम्सना बाजूला ठेवत प्रत्यक्ष मैदानात उतरून उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.




आयपीएलच्या धर्तीवर खेळाडूंचा लिलाव, संघमालकांची संकल्पना व नियोजनबद्ध सामने अशा अभिनव पद्धतीने ही स्पर्धा पार पडली. एकूण १२ संघांच्या सहभागाने ही स्पर्धा अत्यंत रंगतदार ठरली. अंतिम सामन्यात धरणगाव येथील क्लास वन इलेव्हन संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत विजेतेपद पटकावले. सोनवद येथील ड्रॉइड अल्फा संघ उपविजेता ठरला, तर ज्योतीदेवी क्रिकेट क्लब संघाने तृतीय क्रमांक पटकावला. स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करणारे स्वप्नील पाटील यांना मॅन ऑफ द टुर्नामेंट पुरस्काराने गौरविण्यात आले. विजेत्या संघाचा विशेष सत्कार करण्यात आला. सर्व संघांनी आपापल्या सामन्यात उत्कृष्ट खेळ सादर करत प्रेक्षकांचे मनोरंजन केले. उत्कंठावर्धक सामन्यांमुळे मैदानावर मोठ्या संख्येने प्रेक्षकांची उपस्थिती लाभली.

### धुळे जिल्ह्यात ३३० कोटी १० लाखांची थकबाकी

प्रतिनिधी । धुळे

महावितरणकडून वीजबिल थकबाकीदारांविरुद्ध धडक मोहीम हाती घेण्यात आली आहे. वारंवार आवाहन करूनही बिल न भरणाऱ्या साधारणतः चार हजार ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला आहे. जळगाव, धुळे व नंदुरबार या तिन्ही जिल्ह्यात कृषी वर्गवारी वगळता महावितरणची ११२९ कोटी २९ लाख रुपयांची थकबाकी आहे. यात धुळे जिल्ह्यात ३३० कोटी १० लाख व नंदुरबार जिल्ह्यात २३० कोटी ५३ लाख रुपयांची थकबाकी आहे.

# नंदुरबारला 'राष्ट्रीय मतदार दिन' उत्साहात




प्रतिनिधी । नंदुरबार

**जिल्ह्यातील शासकीय व निमशासकीय कार्यालयांमध्ये राष्ट्रीय मतदार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त परिसंवाद, विविध चर्चासत्रे, विविध स्पर्धा, मतदान प्रक्रियेत सहभागी होण्याची प्रतिज्ञा, स्पर्धा परीक्षांबाबत मार्गदर्शन यासारख्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते, अशी माहिती उप जिल्हा निवडणूक अधिकारी कल्पना ठुबे यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये कळविली आहे.**

जिल्ह्यातील शासकीय व निमशासकीय कार्यालयांमध्ये दि.२३ रोजी लोकशाहीवर निष्ठा ठेवून मतदान प्रक्रियेत सहभागी होण्याची प्रतिज्ञा करण्यात आली. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी डॉ.मित्ताली सेठी यांच्या अध्यक्षतेखाली सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शपथ घेतली. मिशन हायस्कूल येथे परिसंवाद, विविध चर्चासत्रे आणि स्पर्धांसह जिल्हास्तरीय कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. शासकीय आदिवासी मुलींचे वसतीगृह येथे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांचा संदेश यावेळी प्रसारित करण्यात आला तसेच मतदानाची शपथ घेण्यात आली. यावेळी विद्यार्थिनींना जागृत मतदार, मतदाराचे कर्तव्ये व जबाबदाऱ्या तसेच स्पर्धा परीक्षांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमास अपर जिल्हाधिकारी धनंजय गोगटे, सहाय्यक जिल्हाधिकारी अंजली शर्मा, निवासी उपजिल्हाधिकारी आशा संघवी, उपजिल्हाधिकारी प्रमोद भामरे, शाम वाडकर, उपजिल्हा निवडणूक अधिकारी कल्पना ठुबे उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन प्रकल्प अधिकारी चंद्रकांत पवार, उपशिक्षणाधिकारी डॉ. युनूस पठाण, प्राचार्य नुतन वळवी, आदिवासी मुलींचे वसतीगृहाच्या गृहपाल नलिनी अहिरराव यांनी केले.

# भावी वकिलांनी व्यक्तीगत विकासासोबत सामाजिक बांधिलकी जोपासावी

## न्यायाधीश पी.डी. भिडे यांचे प्रतिपादन; हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन

प्रतिनिधी । नंदुरबार

नियमित अभ्यासक्रमासोबतच अवांतर वाचन व प्रत्यक्ष न्यायालयाच्या कामकाजाचे निरीक्षण करून अधिक ज्ञान प्राप्तीसाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. भावी वकिलांनी व्यक्तिगत विकासासोबतच सामाजीक बांधिलकी जोपासावी व त्याचेच संस्कार राष्ट्र सेवा योजनेच्या माध्यमातून रुजवले जातात, असे प्रतिपादन न्यायाधीश पी.डी. भिडे यांनी केले.

नंदुरबार तालुका विधायक समीतीचे श्री. बटेसिंग भैय्या रघुवंशी विधी महाविद्यालयातर्फे राष्ट्रीय सेवा योजनाअंतर्गत आयोजीत विशेष हिवाळी




श्रमसंस्कार शिबिराचे उदघाटन शनिवार, दि.२४ रोजी दुधाळे येथील प्राथमीक व माध्यमीक विद्यालय येथे प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्या.पी.डी. भिडे यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी ते बोलत होते.

यावेळी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठचे सहाय्यक अधिष्ठाता डॉ.व्ही.वाय. बहिरम, शैक्षणिक सांस्कृतीक व क्रीडा संस्थेचे अध्यक्ष अशोक अहिरे, प्राचार्य डॉ.एन. डी. चौधरी, रासेयोचे कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. आशा तिवारी, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. दिनेश गावीत, ग्रंथापाल प्रा.करमरकर, मुख्याध्यापक एच.एस. ठाकरे व एस.यु. भामरे आदी उपस्थीत होते.

शिबिराच्या उद्घाटनानंतर डॉ.विजय बहिरम यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधतांना, आपण भारताचे नागरिक म्हणून देशाचे देणे लागतो. म्हणूनच एक सामाजीक बांधिलकी व जबाबदारी मानून शिबिरात सहभागी होण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले. विधी अभ्यासक्रम हा व्यावसायिक अभ्यासक्रम असला, तरी अर्थार्जनासोबतच आपण सामाजीक बांधिलकीही जोपसायला हवी. भविष्यात सर्व विद्यार्थी केवळ वकिलच नव्हे, तर न्यायाधीश बनण्यापर्यंत मजल मारतील असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला. प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी डॉ.आशा तिवारी यांनी तर सूत्रसंचालन स्वयंसेवक हर्षल शिंदे यांनी केले. आभार स्वयंसेवीका लक्ष्मी मराठे हिने मानले.

# जिल्ह्यात ठिकठिकाणी प्रजासत्ताकदिन उत्साहात साजरा










प्रतिनिधी । जळगाव चमू

**जिल्हाभरातील शासकीय तसेच खासगी शाळा महाविद्यालयात सोमवार दि. २६ जानेवारी रोजी ७७ व्या प्रजासत्ताकदिनानिमित्त ध्वजारोहणाचा कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी मान्यवरांसह, मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षिकेतर कर्मचाऱ्यांसह विद्यार्थी उपस्थित होते.**

### कर्जाणे आरोग्य केंद्र

चोपडा येथे ७७ व्या प्रजासत्ताकदिनानिमित्त कर्जाणे गावातील आरोग्य उपकेंद्रात उपसरपंच प्रमोद बारेला यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी राष्ट्रगीतानंतर संविधानाच्या मूल्यांवर प्रकाश टाकत आरोग्य सेवा हीच खरी राष्ट्रसेवा असल्याचा संदेश देण्यात आला. यावेळी आदिवासी भागात प्राथमिक आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्याचा आणि प्रत्येक गरजू व्यक्तीपर्यंत उपचार पोहोचवण्याचा संकल्प करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी ग्रामस्थांनी उपसरपंच प्रमोद बारेला यांच्या सामाजिक व आरोग्य क्षेत्रातील कार्याचे कौतुक करून त्यांचे अभिनंदन केले. आरोग्य सेवा ही केवळ जबाबदारी नसून माणुसकीचे व्रत आहे, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. प्रसंगी आरोग्य उपकेंद्रातील वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी, आशा सेविका, अंगणवाडी सेविका, ग्रामस्थ व तरुणांची उपस्थिती लक्षणिय होती.

### चोपडा नगरपरिषद

**चोपडा :** नगरपरिषद येथे ७७ वा प्रजासत्ताक दिन अत्यंत उत्साहपूर्ण व देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. नगराध्यक्षा नम्रता सचिन पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी उपनगराध्यक्ष पंकज बोरोलें, गटनेता पियुष चौधरी, मुख्याधिकारी रामनिवास झंवर, गटनेते हितेंद्र देशमुख,गटनेते रमाकांत ठाकूर, गटनेते गजेंद्र जयस्वाल,बांधकाम सभापती हुसेन खाँ अय्युब खाँ पठाण, शिक्षण क्रीडा व सांस्कृतिक कार्य समिती सभापती अमोल पाटील, स्वच्छता वैद्यक आणि आरोग्य समिती सभापती रमेश शिंदे, पाणीपुरवठा व जल निस्सारण समिती सभापती किशोर चौधरी, महिला व बालकल्याण समिती सभापती देवयानी पवन माळी , नगरसेवक हनीफशेठ सत्तार, नगरसेविका रुकसारबी सऊद बागवान, नगरसेवक नरेंद्र पाटील, नगरसेवक राजनंदिनी पाटील, नगरसेविका दीपाली चव्हाण, नगरसेवक दीपक पाटील,उपमुख्याधिकारी संजय मिसर, नगर अभियंता दिगंबर वाघ, आरोग्य अधिकारी दीपाली साळुंखे, जयेश भोंगे, कर अधिकारी प्रणव पाटील, पाणीपुरवठा अधिकारी जितेंद्र मोरे, विद्युत अधिकारी प्रमोद पाटील, संजय धुमाळ, अनिल चौधरी यांच्यासह सर्व नगरसेवक व प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी तसेच देशप्रेमी नागरिक, सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### प्रताप विद्यामंदिर

**चोपडा –** स्वतंत्र भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताकदिनानिमित्त प्रताप विद्यामंदिर येथे कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्यात सर्वप्रथम स्वतंत्र भारताच्या राष्ट्रीय ध्वजाचे ध्वजारोहण करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. यानंतर भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकाचे वाचन, कॉपीमुक्त वातावरणात परीक्षा देण्याची प्रतिज्ञा, तसेच तंबाखूमुक्त भारत या प्रतिज्ञा घेण्यात आल्या. कार्यक्रमात पुढे संगीत कवायत याचेदेखील सादरीकरण करण्यात आले. कार्यक्रमाला मुख्य आकर्षण म्हणजे एनसीसी प्रथम वर्ष व द्वितीय वर्ष तसेच आरएसपी स्काऊट गर्ल गाईड या विद्यार्थ्यांच्या संचलनासाठी एनसीसी अधिकारी रोहन पाटील व जे. आर. बडगुजर यांचे मार्गदर्शन लाभले.

सदर कार्यक्रमास चोपडा एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन राजा मयूर, उपाध्यक्ष अग्रवाल , सचिव माधुरी मयूर, कार्यकारिणी सदस्य चंद्रहास गुजराथी, प्रशालेचे मुख्याध्यापक प्रशांत गुजराथी, उपमुख्याध्यापक माधुरी पाटील, उपप्राचार्य जोगेश शेलार, पर्यवेक्षक ए.एन.भट, एस.व्ही.करमरकर, पंकज नागपुरे, संस्थेचे समन्वयक गोविंद गुजराथी, डी.टी. महाजन तसेच चोपडा एज्युकेशन सोसायटीच्या विविध शाखांचे पदाधिकारी तसेच आजी-माजी ज्येष्ठ शिक्षक तसेच शिक्षक बंधू-भगिनी यांची उपस्थिती लाभली. सूत्रसंचालन एजाज शेख यांनी केले.

### ज्येष्ठ नागरिक संघ

**चोपडा –** येथील ज्येष्ठ नागरिक संघात २६ जानेवारी सोमवार रोजी सकाळी ८:१५ वाजता प्रजासत्ताक दिनानिमित्त संघाचे अध्यक्ष जयदेव देशमुख यांच्या हस्ते ध्वजारोहणाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात झाला.

यावेळी माजी नगराध्यक्ष रमणलाल गुजराथी, विश्वनाथ साळुंखे, विजय करोडपती, रमेश शिंदे, नेरपगारे, गोविंदा महाजन, दिलीपराव, श्याम गुजराथी, प्रमोद डोंगरे, डी.आर.परदेशी, एन .डी. महाजन, गोकुळ पाटील, परशुराम पेंढारकर, विलास सु. पाटील. नलिनी, मधुकर साळुंखे, जेठे नाना, संजू बजाज, अलिझाड, बारी, एस.जी.महाजन, एस.के.पाटील, प्रकाश चौधरी, साहेबराव गुरुजी, प्रमोद अहिरराव, देविदास धनगर, संजय जगताप लोटन पाटील, बाविस्कर गुरुजी, एकनाथ पाटील, रामकृष्ण महाजन, हाफीज अली यासह सभासद बंधू-भगिनी हजर होते.

### गृप ग्रामपंचायत विचखेडे, धुपे खु

**चोपडा –** गृप ग्रामपंचायत विचखेडे, धुपे खु येथे प्रजासत्ताक दिनाचे ध्वजारोहण २६ जानेवारी रोजी सकाळी ८ वाजता ग्रामपंचायत कार्यालय विचखेडे येथे तापी शेतकरी सहकारी सूतगिरणीचे संचालक चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते ध्वज पूजन, सलामी देऊन ध्वजारोहण करण्यात आले. जिल्हा परिषद मराठी शाळा विचखेडा येथे सुरेश तुळशीराम पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी सावित्रीबाई रामदास पाटील बहुउद्देशीय संस्था चहार्डी सचिव भगवान (गुरुजी) दत्तू पाटील चहार्डी,अध्यक्ष दत्तात्रय श्रावण पाटील एरंडोल , उपाध्यक्ष रवींद्र सिताराम पाटील , यांच्या बहुउद्देशीय संस्थेमार्फत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य लोकनियुक्त सरपंच रवींद्र पाटील यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. यावेळी दिवाण पाटील ,तुषार पवार, विजय बोरसे, प्रताप न्हावी, सोपान पाटील, संदेश शिरसाठ, सुरेखाबाई पाटील ,अंगणवाडी शिक्षिका मीना पाटील, मदतनीस अनिता शिरसाठ ,आशा वर्कर न्याहाळोदे यावेळी आदी मान्यवर उपस्थित होते.

### इंदिरा गांधी माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय

**धरणगाव –** येथील इंदिरा गांधी माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय तसेच आदर्श माध्यमिक विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात व शिस्तबद्ध वातावरणात साजरा करण्यात आला. या सोहळ्यातून देशप्रेम, संविधानिक मूल्ये आणि राष्ट्रीय एकात्मतेचा प्रभावी संदेश देण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला इंदिरा गांधी कनिष्ठ महाविद्यालयाचे ज्येष्ठ प्रा. एस. एन. चौधरी यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी राष्ट्रगीत, राज्यगीत व झेंडागीताचे सामूहिक गायन करत राष्ट्रध्वजाला मानवंदना देऊन देशभक्तीच्या घोषणा देण्यात आल्या. यानंतर विद्यालयातून भव्य प्रभातफेरी काढण्यात आली. प्रभातफेरीच्या प्रारंभी ज्येष्ठ शिक्षक किरण चव्हाण यांनी भारतीय संविधानाच्या प्रस्ताविकेचे वाचन करून विद्यार्थ्यांना संविधानातील मूल्यांचे महत्त्व पटवून दिले. कार्यक्रमास इंदिरा गांधी विद्यालयाचे चेअरमन डी. जी. पाटील, सचिव सी. के. पाटील, संचालक भरत पाटील व अश्विन पाटील, आदर्श माध्यमिक विद्यालयाचे अध्यक्ष, प्राचार्या सुरेखा पाटील, प्रा.व्ही. जी. पाटील प्राथमिक विद्यामंदिराचे मुख्याध्यापक बळवंत पाटील, आदर्श प्राथमिकचे मुख्याध्यापक शशिकांत पाटील, आदर्श माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य संदीपकुमार सोनवणे आदी मान्यवर उपस्थित होते. ध्वजवंदनानंतर विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, एकात्मता व शौर्यभावना निर्माण व्हावी यासाठी बाबाजी मासुळ यांनी देशभक्तीपर गीतांवर संगीत कवायतीचे आकर्षक प्रात्यक्षिक सादर केले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रम अधिकच रंगतदार ठरला. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन डी. एन. पाटील यांनी केले. या संपूर्ण उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रनिष्ठा, देशभक्ती व संविधानाबद्दल आदरभाव निर्माण झाल्याचे स्पष्टपणे दिसून आले. प्रजासत्ताक दिनाच्या या सोहळ्यामुळे धरणगाव परिसरात राष्ट्रभक्तीचे वातावरण निर्माण झाले.

### देवेंद्र प्रमोद पाटील प्राथमिक विद्या मंदिर

**शिरसोली –** येथील देवेंद्र प्रमोद पाटील प्राथमिक विद्या मंदिर, हिराबाई जगतराव पाटील माध्यमिक विद्यालय व जगतराव बारकू पाटील उच्च माध्यमिक विद्यालयात ७७ वा भारतीय प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात आणि देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण असलेले ध्वजारोहण शिरसोली (प्र.बो.) चे सरपंच नितीन अर्जुन बुंधे यांच्याहस्ते करण्यात आले. राष्ट्रगीताने तिरंग्याला दिलेल्या सलामीने परिसरातील वातावरण भारावून गेले होते. याप्रसंगी जिजामाता विद्याप्रसारक मंडळाचे संस्थापक, उत्तर महाराष्ट्र राज्य फेस्कॉमचे अध्यक्ष व शाळेचे अध्यक्ष जगतराव पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच शालेय समिती चेअरमन प्रमोद जगतराव पाटील, शिरसोलीचे माजी सरपंच प्रदीप पाटील, पीक संरक्षण सोसायटीचे सचिव पुनमचंद भादू माळी, प्रेरणा ज्येष्ठ नागरिक मंडळाचे सचिव भिकन खाटीक, सदस्य मोहम्मद पिंजारी, पोलीस पाटील शरद पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

ध्वजारोहणानंतर विद्यार्थ्यांनी विविध कलागुण सादर केले. यामध्ये सामूहिक संगीत कवायतमध्ये शिस्तबद्ध हालचालींनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. 'ए मेरे वतन के लोगो' यासारख्या गीतांनी वातावरण देशप्रेमाने भारावून गेले होते.







## थोडक्यात

### प्रताप महाविद्यालयात निबंध लेखन स्पर्धा

**अमळनेर ।** येथील प्रताप महाविद्यालयातील (स्वायत्त) मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचे निमित्त व राष्ट्रीय मतदारदिनाचे औचित्य साधून दि. २२ जानेवारी रोजी सकाळी ११ ते १२ या वेळेत सीसीएम सीच्या हॉलमध्ये निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांमध्ये मतदानाबाबत जागृती निर्माण करणे, लोकशाही मूल्यांचे महत्त्व अधोरेखित करणे तसेच मतदानाच्या अधिकाराचे आणि कर्तव्याचे महत्त्व पटवून देणे हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश होता.

### अजय सोन्नी उत्कृष्ट बीएलओ पुरस्काराने सन्मानित

**नगरदेवळा, ता. पाचोरा ।** येथील सरदार एस. के. पवार माध्य व उच्च माध्यमिक विद्यालयातील उपशिक्षक अजय जगन्नाथ सोन्नी यांचा उत्कृष्ट मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) म्हणून सन्मान करण्यात आला. पाचोरा येथील एम एम कॉलेजचे प्राचार्य डॉ. शिरीष पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित समारंभात प्रमुख पाहुणे प्रांताधिकारी भूषण अहिरे यांच्या हस्ते त्यांना सन्मानित करण्यात आले. या प्रसंगी निवडणूक अधिकारी नायब तहसिलदार रणजित पाटील हे देखील समारंभास उपस्थित होते.

# स्वच्छता, दिवाबत्तीच्या तक्रारींसाठी व्हॉट्सॲप क्रमांक उपलब्ध

प्रतिनिधी । चोपडा

**चोपडा नगरपरिषद ही शहरातील नागरिकांना नियमितपणे विविध नागरी सुविधा आ.प्रा.चंद्रकांतअण्णा सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली तत्परतेने पुरविण्याचे काम करीत आहे. यामध्ये स्वच्छता, विद्युत विभाग (स्ट्रीट लाईट) विभागाशी संबंधित नागरिकांच्या तक्रारी विविध माध्यमांतून नगरपरिषदेस प्राप्त होत असतात. मात्र, अनेक वेळा नागरिकांना कोणत्या अधिकारी किंवा कर्मचाऱ्याशी, कोणत्या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, याबाबत संभ्रम निर्माण होत होता. त्यामुळे तक्रारी निवारणास विलंब होत होता. परिणामी नागरिकांची हेळसांड होत असल्याचे निदर्शनास आले होते.**

ही बाब लक्षात घेऊन नगराध्यक्षा नम्रता पाटील व मुख्याधिकारी रामनिवास झंवर यांच्या संकल्पनेतून स्वच्छता विभाग व विद्युत विभागासाठी स्वतंत्र भ्रमणध्वनी उपलब्ध करून देत तक्रार निवारणासाठी स्वतंत्र व्हॉट्सॲप क्रमांक निश्चित केला आहे. या माध्यमातून आता नागरिक घरबसल्या तक्रारी करू शकतील. या तक्रारी व्हॉट्सॲप संदेशाद्वारे स्वीकारण्यात येणार आहेत.

या तक्रार निवारण भ्रमणध्वनीचे दि.२७ जानेवारी रोजी अनावरण करण्यात आले. यावेळी बोलताना नगराध्यक्षा नम्रता पाटील यांनी सांगितले की, शहरातील नागरी सुविधा अधिक सक्षमपणे राबविणे तसेच नागरिकांच्या तक्रारींचे तत्काळ व प्रभावी निराकरण करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

शहरातील कचरा वेळेवर न उचलणे, सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता, कचरा साचणे, सार्वजनिक स्वच्छतागृहांशी संबंधित समस्या, तसेच रस्त्यावरील दिवे बंद असणे, नादुरुस्त होणे किंवा अपुऱ्या प्रकाशामुळे होणाऱ्या अडचणी याबाबत नागरिकांनी थेट नगरपरिषदेकडे व्हॉट्सॲप संदेशाद्वारे तक्रारी नोंदवाव्यात, असे आवाहन मुख्याधिकारी रामनिवास झंवर यांनी नगरपरिषद प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

नागरिकांच्या सोयीसाठी तक्रार क्रमांक उपलब्ध करून देण्यात आले आहेत. या क्रमांकावर प्राप्त होणाऱ्या प्रत्येक तक्रारीची नोंद घेऊन संबंधित विभागप्रमुख व कर्मचारी यांच्यामार्फत तात्काळ पाहणी करून आवश्यक कार्यवाही करण्यात येणार असल्याचेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.





**➤ स्वच्छता विभाग तक्रार क्रमांक : ७८२१९८९५३३, विद्युत (दिवाबत्ती) विभाग तक्रार क्रमांक : ९५२९२९६९२१, तक्रार नोंदणी : तक्रार व्हॉट्सॲप संदेशाद्वारे स्वीकारण्यात येईल. शहर स्वच्छ, सुरक्षित व प्रकाशमान ठेवण्यासाठी नागरिकांनी या सेवेचा योग्य वापर करावा, असे आवाहन चोपडा नगरपरिषद प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.**

• चोपडा नगरपरिषदेचा अभिनव उपक्रम!



# घोडगावच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

## • दहावीचे माजी विद्यार्थी ३० वर्षांनंतर आले एकत्र

प्रतिनिधी । चोपडा

**तालुक्यातील घोडगांव येथील नूतन शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सी. बी. निकुंभ माध्य. व उच्च माध्य. विद्यालयात १९९५ ला १० वीत शिकणाऱ्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात पार पडला.**

याप्रसंगी प्रमुख मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व सरस्वती पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी शाळेचे आजी-माजी शिक्षक उपस्थित होते. यात कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी शिक्षक के. एस. महाजन, प्रमुख अतिथी माजी मुख्याध्यापक पी. एच. महाजन, माजी मुख्याध्यापक व्ही. एम.पाटील, के.आर. सोनवणे, माजी मुख्याध्यापक डी. पी. पाटील, माजी मुख्याध्यापक व्ही. ए.नागपुरे, एस. एस. कापडणे, विद्यमान मुख्याध्यापक आर. एम.चौधरी , माजी विद्यार्थी पारसमल जैन, माजी शिक्षकेतर कर्मचारी निंबा पाटील, प्रकाश पाटील, छोटू सोनार आदी उपस्थित होते. यावेळी मान्यवरांना भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. यानंतर माजी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यात उज्ज्वल पाटील, सुनिता मगरे, उज्ज्वला पाटील, किशोर कांडेले, शेख शकील शेख सलीम, संतोष शिरसाठ, रुपाली जैन, रिना पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त करताना शाळेविषयी व गुरुजनाप्रति कृतज्ञता व्यक्त केली.

### यांनी केले मार्गदर्शन

व्ही. ए. नागपुरे, डी. पी. पाटील, एस. एस. कापडणे, के. आर. सोनवणे, व्ही. एम. पाटील, पी. एच. महाजन यांनी आपले विचार मांडत जुन्या आठवणींना उजाळा दिला. अध्यक्षीय भाषणात के. एस. महाजन यांनी आताच्या परिस्थितीत शिक्षणाला अध्यात्माची जोड देण्यात यावी, असे विचार मांडले. यावेळी माजी विद्यार्थ्यांनी शाळेला भेटवस्तू म्हणून गोदरेज कपाट दिले. त्याच्या चाव्या शाळेचे विद्यमान मुख्याध्यापक आर.एम. चौधरी यांना देण्यात आल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माजी विद्यार्थी व शाळेचे उपशिक्षक सतीश आर. पाटील यांनी तर आभार संतोष शिरसाठ यांनी मांडले. यावेळी माजी विद्यार्थ्यांना संपर्क करून एकत्र करणे, कार्यक्रमाचे नियोजन व यशस्वीतेसाठी मेहनत करणाऱ्या रुपाली जैन, मोहन लोहार, नटवरलाल पाटील, रेखा पाटील, संदीप पाटील या माजी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यानंतर सर्व माजी विद्यार्थी त्यांच्या तेव्हाच्या वर्गात गेले तेथे माजी शिक्षकांनी तासिका घेतली. तसेच शिरपूर येथील सुप्रसिद्ध अँकर सुजाता जैन यांनी सर्व माजी विद्यार्थ्यांचे विविध मनोरंजनपर खेळ, चुटकुले, शेरोशायरी, विनोद, संगीत डान्स, गमतीदार प्रश्नोत्तरी सादर करत सर्वांचे मनोरंजन केले.

